ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ पुणे, बुधवार, १५ जुलै, १९७० अंक १४





# वर्षा इंडस्ट्रीजचे नॉनफेरस कास्टिंग्जचे तज्ज्ञ श्री. करडे व सौ. करडे ह्यांचा परदेश दौरा



पुण्याच्या कर्वे रोडवर असलेल्या, वर्षा इंडस्ट्रीजचे प्रोप्रायटर, एक तळमळीचे नामवंत समाज सेवक आणि दानशूर उद्योगपती श्रीमान दत्तात्रय शंकर करडे, बी. ए., बी. कॉम., एलएल. बी. व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. श्यामला दत्तात्रय करडे, जपानने भरविलेल्या एक्स्प्रो ७० या जागतिक प्रदर्शनाला भेट देण्यासाठी ४ जुलै १९७० रोजी रवाना झाले.

हिंदुस्थानातील वॅन्डॅन्क व वॅंड फ्लेक्स या जगप्रसिद्ध घड्याळाच्या पट्ट्याचे निर्माते, एक श्रेष्ठ दर्जाचे समाजसेवक, मुंबईतील स्वीच् ट्रेडिंग कॉर्पोरेशनचे आद्य सूत्रधार, महाराष्ट्रातील एक नामवंत नि अतिशय लोकप्रिय उद्योगपती, श्रीमान मधुकरराव सदाशिवराव तथा भाऊसाहेब वडके यांच्या सौ. श्यामलाताई करडे या कन्या होत.

श्री. करडे यांच्या स्वतःच्या मालकीचा, कर्वे रोड येथे "वर्षा इंडस्ट्रीज" या नावाचा कारखाना असून, किर्लोस्कर न्युमॅटिक्स (हडपसर), किर्लोस्कर ऑईल एंजिन्स (खडकी), किर्लोस्कर कमिन्स (कोथरूड), वालचंदनगर इंडस्ट्रीज (वालचंदनगर), सी. टी. आर. (नगररोड) असे आजच्या औद्योगिक क्षेत्रातील आघाडीचे कारखानदार त्यांचे कस्टमर्स आहेत. विशेष म्हणजे श्री. करडे हे स्वतः बी. ए., बी. कॉम., एलएल्. बी. आहेत व ते नॉनफेरस कास्टिंग्ज या क्षेत्रातील एक फार मोठे अधिकारी नि तज्ज्ञ म्हणून गणले जातात.

श्री. करडे यांचे शालेय शिक्षण पाली (ता. सुधागड, जि. कुलाबा) येथे व महाविद्यालयीन शिक्षण वाडिया कॉलेज येथे झाले. श्री. करडे हे अवघ्या सहा वर्षांचे असताना त्यांचे वडील वारले. वडिलांच्या पश्चात त्यांच्या मातोश्रीने अत्यंत हाल सोसून आपल्या या एकुलत्या एक मुलाला पदवीधर आणि कारखानदार म्हणून घडविले.

कारखानदार म्हणून घडविला गेलेला हा उमदा तरुण पुढे श्रीमान भाऊसाहेब वडके यांचा जावई झाला. आपल्या पदवीधर जावयाने औद्योगिक क्षेत्रात काही तरी भरीव कामगिरी करून महाराष्ट्राच्या नावाला उजाळा द्यावा या सद्भावनेने श्री. भाऊसाहेब वडके ह्यांनी श्री. करडे यांना सक्रिय सहकार्य दिले. पाली (कुलाबा) जवळील जांभूळ पाड्यात केमिकल इंडस्ट्रीज काढून त्या परिसरातील खेड्यातील असंख्य लोकांना उद्योग मिळवून देण्याचे श्री. करडे ह्यांचे स्वप्न आहे.

---

### सहकारी ध्वजासंबंधी शैक्षणिक फिल्म स्ट्रीप : शितोळे बंधूंचा अभिनव उपक्रम

सप्तरंगी सहकार ध्वज सहकारी चळवळीचे प्रतीक मानले आहे. परंतु हा ध्वज सप्तरंगीच का, याबाबतचा इतिहास लोकांना विशेष परिचित नव्हता. सहकारी चळवळ ही विश्वव्यापी चळवळ आहे, ही गोष्ट ध्यानात घेऊन ह्या ध्वजाची महती कळविण्याच्या ईर्षेने एका धाडसी तरुणाने सहकारी ध्वजाच्या इतिहासावर आधारित २१ रंगीत चित्रांची एक माहितीपूर्ण व उद्बोधक फिल्म स्ट्रीप तयार केली आहे.

श्री. दिनेशचंद्र व. शितोळे हे ह्या कल्पक तरुणाचे नाव असून मेसर्स शितोळे बंधू ह्या नावाची त्यांची फर्म असून त्या फर्मच्या नावाखालीच ही फिल्म स्ट्रीप तयार करण्यात आली आहे.

ह्या फिल्म स्ट्रीपची लांबी चार फूट असून त्यामध्ये सप्तरंगी सहकार ध्वजाचा जन्मापासूनचा इतिहास थोडक्यात सांगितला आहे. यामध्ये चार्ल्स जीड या सहकार आणि अर्थशास्त्रातील एका तज्ज्ञाचे एकमेव दुर्मिळ चित्र मिळवून त्याचा फिल्म स्ट्रीपमध्ये समावेश करण्यास आला आहे. जेथे नफ्याचा हेतू असणार नाही व जेथे सामाजिक आणि आर्थिक जीवनात मुलगामी परिवर्तन झालेले असेल अशा सहकारी प्रजासत्ताकाच्या कल्पनेचे त्याने बीजारोपण, संगोपन केले व ती कल्पना प्रसृत केली.

या फिल्म स्ट्रीपची सुरुवात एका जुन्या दंतकथेवर असून शेवट जगातील सर्व राष्ट्रांच्या ध्वजांपेक्षा उच्चपदावर असलेल्या सहकारी ध्वजाच्या चित्राने केला आहे. या फिल्म स्ट्रीपला इंग्लंड, अमेरिका, इराण, सिलोन व मॉरिशस येथूनही मागणी आली आहे. तसेच गुजरात, मध्यप्रदेश, म्हैसूर, जम्मू-काश्मिर ह्या राज्यांनीही ह्या फिल्म स्ट्रीपची मागणी केली आहे.

ह्या फिल्म स्ट्रीपचे शैक्षणिक महत्त्व ओळखून महाराष्ट्र राज्य सहकारी संघाने सहकार प्रशिक्षण केंद्रामधील विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी या फिल्म स्ट्रीपसाठी मेसर्स शितोळे ब्रदर्स यांजकडे मोठी ऑर्डर नोंदवून त्यांस उत्तेजन दिले आहे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १५ जुलै, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

## समृद्धीचे दिवस अजूनही दूर आहेत

भारताला आर्थिक मदत करणाऱ्या देशांच्या पॅरिस येथे भरलेल्या बैठकीत जागतिक बँकेचा वार्षिक अहवाल सादर करण्यात आला. ह्या अहवालात चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या उरलेल्या अवधीत ठरविलेली उद्दिष्टे गाठण्याच्या भारताच्या शक्तीबद्दल शंका व्यक्त करण्यात येऊन असे म्हटले आहे की, योजनेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी अधिक काळ लागण्याची आवश्यकता आहे. परंतु तरीही बहुसंख्य दरिद्री लोकांच्या जीवनाची भरभराट होण्यास मात्र बराच अवधी लागणार आहे. कारण, देशाची लोकसंख्या आणि काम मागणारांची संख्या ह्यांची वाढ फार मोठ्या गतीने होत आहे. सर्वसामान्यपणे पाहिले तर भारताचे आर्थिक चित्र समाधानकारक दिसते. पण विकासाचा वेग वाढविण्यासाठी जरूर असणाऱ्या साधनसंपत्तीची टंचाई मात्र कमी झालेली नाही. भारताच्या शेतीच्या तंत्रात बरीच सुधारणा झालेली आहे. गेल्या काही वर्षात गव्हाच्या लागवडीच्या बाबतीत विलक्षण प्रगति होऊन त्याचे उत्पादन झपाट्याने वाढले. तथापि, इतर पिकांच्या बाबतीत इतकी वेगाची प्रगतीची अपेक्षा करणे योग्य होणार नाही. त्यांच्या बाबतीत प्रगति अधिक संथपणाने होणे शक्य आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आलेली इतर उद्दिष्टेही जरा उंचच वाटतात. भारताच्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नात फक्त उत्पादन वाढीवरच भर देऊन भागणार नाही. उत्पादन वाढीबरोबरच रोजगारी वाढण्याच्या प्रयत्नांवरही भर देण्यात आला पाहिजे. ह्याचा अर्थ भारतामधील हरित-क्रांतीने दाखविलेली आशा फोल आहे असे नव्हे. पण हरित-क्रांतीची फळे संपूर्णपणे पदरात पडण्यासाठी अजून बरेच अवघड आणि पाठीला रग लागण्यासारखे कष्ट करण्याची आवश्यकता आहे.

---

## बेकारीच्या प्रश्नाचे अवाढव्य स्वरूप

हिंदमधील बेकारीच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी राज्य सरकारच्या प्रमुख चिटणिसांची परिषद भरली होती. परिषदेत झालेल्या चर्चेत ह्या प्रश्नाचे स्वरूप केवढे अवाढव्य आहे ते स्पष्ट झाले. आर्थिक नियोजनाचे एतद्संबंधीचे प्रयत्न सफळ झालेले नाहीत. प्रत्येक पंचवार्षिक कार्यक्रमाअखेर बेकारांच्या फौजेत वाढच झाल्याचे दिसून येते. एक अंदाज असा आहे की सध्या देशात ४ कोटी लोक बेकार असावेत. त्यात ग्रामीण भागातील न दिसणारी बेकारीची भर लक्षात घेतली की प्रश्न अधिकच विक्राळ स्वरूप धारण करतो. ग्रामीण भागातील काम करू शकणाऱ्या स्त्री-पुरुषांना फक्त शेतीच्या हंगामातच काम मिळते. बाकीचे दिवस त्यांना बेकारीत घालवावे लागतात. देशातील लोकसंख्येची जोमाने होणारी वाढही बेकारीची व्याप्ती वाढण्याचे कारण आहे. दररोज सुमारे १० हजार नव्या बेकारांची भर पडत असते. परिषदेत छोट्या शेतकऱ्यांना व भूमिहीन मजुरांना काम देण्याच्या कांही योजनांचा विचार करण्यात आला. ह्या योजना अमलात आल्या तरी सुद्धा बेकारांच्या संख्येत फारशी घट होणार नाही. कारण ग्रामीण भागातील बेकारीचे निर्मूलन करण्यासाठी आखावयाच्या योजनांना लागणारा खर्च फार प्रचंड आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत अशा कामासाठी २२५ कोटीच रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हा कार्यक्रम अमलात आणून फार तर ५ लाख नव्या नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतील. पूर्ण रोजगारीचा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी ७७ हजार कोटी रुपये लागतील असा तज्ज्ञांचा कयास आहे.

---

## डायजेस्ट ऑफ बँकिंग डिसिजन्स *

बँक ऑफ इंडिया लि. चे एक निवृत्त अनुभवी अधिकारी, श्री. बी. आर. केंभावी, बी. ए. (ऑनर्स) ह्यांनी बँकांशी संबंधित न्यायालयीन निवाड्यांचा सारांश देणारे हे इंग्रजी पुस्तक परिश्रमपूर्वक तयार करून प्रसिद्ध केले आहे. बँकर्सना त्यांच्या दैनंदिन व्यवहारात ह्या निवाड्यांचा उपयोग होईल, ह्यात शंका नाही. बँकिंगच्या विद्यार्थ्यांनाही ते उपयुक्त वाटेल आणि बँकांशी संबंध येणाऱ्या सर्वांनाच उद्बोधक आणि मनोरंजक ठरेल. प्रत्येक बँकेच्या प्रत्येक कचेरीत ह्या पुस्तकाची प्रत असावयास हवी. निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या ठिकाणी प्रसिद्ध झालेले निवाडे निवडून काढून त्यांचा योग्य शब्दात सारांश सादर करण्याचे अत्यंत बिकट काम श्री. केंभावी ह्यांनी केले आहे. प्रत्येक निवाड्याच्या शेवटी तो निवाडा विस्ताराने कोठे वाचावयास मिळेल, ते दिग्दर्शित केले आहे. पुस्तकाच्या संपादकांनी पुस्तकाचे नाव "समरी ऑफ लीगल डिसिजन्स अफेक्टिंग बँक्स" असे ठेवले होते असे दिसते. प्रत्येक पृष्ठावर तेच नाव असून फक्त मुखपृष्ठावर "डायजेस्ट ऑफ बँकिंग डिसिजन्स" असे नवे नाव छापले आहे आणि ते अधिक सुटसुटीत आहे.

* संपादक व प्रकाशक: बी. आर. केंभावी, अ ५, बँक ऑफ इंडिया वसाहत, पर्वती पो. ऑ. पुणे ९. पृ. सं. ८३. किं. ८ रु.

### मिठापूर खत कारखान्याला परवानगी मिळाली

मिठापूर येथे काढण्यात यावयाच्या टाटा केमिकल्सच्या खताच्या कारखान्याला-भारत सरकारने मान्यता दिली आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीसाठी ५५ कोटी रुपये भांडवल लागणार असून त्याची वार्षिक उत्पादनक्षमता ८·५ लाख खताची आहे. भांडवलाच्या खर्चापैकी २५ कोटी रुपये परदेशी चलनात खर्च करावे लागणार आहेत. कंपनी खात्यातर्फे अजून कारखान्याला मान्यता मिळावयाची आहे. इतका मोठा कारखाना खाजगी मालकीच्या क्षेत्रात उभारू द्यावा की नाही ह्याबद्दल खूपच वादंग माजले होते; आणि परिणामी कारखान्याबद्दल अनिश्चिती निर्माण झाली होती. खताचा कारखाना काढण्यासाठी टाटा कंपनीने प्रथम आपली एक योजना सरकारला सादर केली होती. परंतु ती सरकारच्या पसंतीस उतरली नाही. नंतर कंपनीने दुसरी योजना सरकारच्या मंजुरीसाठी पाठविली. तिला आता मंजुरी मिळाली आहे. संकल्पित नव्या कारखान्यात तयार होणारे खत पेट्रोल तेलाच्या वापराने तयार करण्यात येणार आहे. अमोनिआची आयात करून त्याच्या वापराने खत तयार करणारे कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागातच काढण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आहे. ओरिसात परदीप ह्या ठिकाणी अशा प्रकारचा कारखाना काढण्या-संबंधीचा तांत्रिक अहवाल तयार करण्याच्या सूचनाही सरकारने दिल्या आहेत. त्या शिवाय तालचेर आणि रामगुंडम ह्या दोन ठिकाणी दगडी कोळशाचा वापर करून दोन खत-कारखाने लवकरच काढण्यात यावयाचे आहेत. दोन्ही कारखाने फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ काढणार आहे.

### यंत्रचलित नांगरांची चोरटी निर्यात

सोन्याच्या चोरट्या आयातीचे वृत्त नाही असे फारच थोडे दिवस जातात. भारतात सोन्याला इतर देशांच्या मानाने मोठा भाव असल्याने हा चोरटा व्यापार चालतो. सोने ही वस्तू चोरून नेण्यास सोपी. पण यंत्रचलित नांगरांचीही चोरटी निर्यात होऊ शकते; आणि तीही ब्रिटनसारख्या प्रगत देशांतून नॉर्वे, स्वीडन, कॅनडा आणि अमेरिका ह्या देशांत. ह्या देशांतून चोरट्या यंत्र-चलित नांगरांचा छुपा व्यापार बऱ्याच प्रमाणावर चालू आहे. ब्रिटनमध्ये बनविलेली अद्ययावत शेतकीची अवजारे चोर-बाजारात विकली जाण्याचे प्रमाण इतके मोठे झाले आहे की ब्रिटनच्या कारखानदारांना आपली कायदेशीर निर्यात घटू लागण्याची भीती वाटू लागली आहे. ह्याचे कारण सहज समजण्यासारखे आहे. ब्रिटनमध्ये बनविण्यात आलेले ट्रॅक्टर्स आणि इतर अवजारे ह्यांचा दर्जा फारच चांगला असतो. परदेशांत ह्या मालाच्या ज्या किंमती आहेत त्यांच्यापेक्षा ब्रिटनमधील किंमती जवळजवळ १० टक्क्यांनी कमी आहेत. त्यामुळे चोरटा व्यापार करणाऱ्यांना चांगली संधी मिळते. ब्रिटनमधील शेतकऱ्यांशी संगनमत करून शेतीच्या अवजारांचा पुष्कळसा साठा ते करतात. ही नवी अवजारे मग युरोपातील देशांत अगर अमेरिकेत पाठविली जातात. अवजारांची मूळची किंमत कमी असल्याने परदेशांतील बाजारांत असलेल्या त्यांच्या किंमतीपेक्षा २५ टक्के कमी किंमत घेणे सुद्धा चोरट्या व्यापारात गुंतलेल्यांना सहजच परवडते. शेतीची अवजारे ब्रिटनमधून निर्यात करण्यास परवाना घ्यावा लागत नाही. परंतु परदेशी बंदरांत माल पोचल्यावर त्याची कसून तपासणी करण्यात येते. शेतीच्या अवजारांसारखे अवजड साहित्य चोर बाजारात कसे जाते हे कोडेच आहे.

### नाविक दलाच्या विस्ताराचे चीनचे प्रयत्न

चीनने बोटी बांधण्याच्या उद्योगधंद्यावर अधिक जोर देण्याचे ठरविले आहे. गेल्या काही वर्षांत चीनच्या व्यापारी बोटींच्या काफिल्यात वाढ झाल्याचे निरीक्षकांच्या नजरेतून सुटलेले नव्हतेच. परंतु आता चीनने नौदलाच्या विस्तारावर भर देण्यास आरंभ केलेला आहे. जपानच्या परराष्ट्र खात्याच्या माहितीप्रमाणे चीनच्या व्यापारी दळणवळणाच्या बोटीत गेल्या १० वर्षांत दुपटीने वाढ झालेली आहे. मोठ्या आकाराच्या मालवाहू बोटी चीन स्वतःच बांधू लागला आहे. शिवाय पर-देशांकडून अशा बोटी विकत घेण्यात येत आहेतच. १९६३ साली चीनने बोटींच्या खरेदीसाठी अवघे १ लाख डॉलर्स खर्च केले होते. १९६७ साली चीनने २ कोटी डॉलर्सच्या बोटी परदेशाकडून खरेदी केल्या. अलीकडे हिंदी महासागर आणि आणि पॅसिफिक महासागर ह्यात रशिआच्या नाविक दलाचे भ्रमण अधिक प्रमाणात दिसून येऊ लागले आहे. ह्या हालचालींना तोंड देण्याचा चीनचा हेतू असावा. चीनचा समुद्रकिनारा १४ हजार किलोमीटर लांबीचा असून त्यावर अनेक मोठी बंदरे पसरलेली आहेत. चीनच्या नाविक दलासंबंधी अधिकृत माहिती फारशी उपलब्ध नाही. लष्कर आणि विमानदल ह्यांच्याशी तुलना करता चीनचे आरमारी सामर्थ्य बरेच तोकडे आहे. शिवाय नाविक दलातील बोटीही परदेशी बनावटीच्या अगर सुट्या भागासाठी परदेशावर अवलंबून असणाऱ्या अशा आहेत. चीनजवळ पाणबुड्यांचा ताफा मात्र आहे. त्यातील पाणबुड्यांची संख्या ३३ च्या आसपास आहे. विमान-वाहतुकीच्या बोटी अगर इतर मोठ्या युद्धनौका मात्र नाहीत.

### रिझर्व्ह बँकेचा इतिहास

वरील ८७८ पृष्ठांचे पुस्तक डॉ. चिंतामणराव देशमुख ह्यांच्या अध्यक्षतेखालील एका संपादक मंडळाने तयार केले आहे. त्यात बँकेच्या गव्हर्नरांचे, डायरेक्टरांचे, चलनी नोटांचे फोटोही दिलेले आहेत. पुस्तकाची किंमत ५० रु. ( ट. खर्च वेगळा ) आहे. शिक्षणसंस्था, ग्रंथशाळा, शिक्षक, ह्यांना ते पुस्तक ३० रु. स मिळेल. ( ट. खर्च वेगळा. )

## वाढत्या किमतींमुळे चिंतेचे वातावरण

दिल्लीमधील सरकारी गोटात आणि नियोजन अधिकाऱ्यांत वाढत्या किमतीमुळे चिंतेचे वातावरण पसरले आहे. गेल्या एप्रिलपासून किमती वाढण्याची प्रवृत्ती दिसू लागली. अपेक्षा मात्र तशी नव्हती. किमतींना पायबंद घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेने मालाच्या तारणावर द्यावयाच्या कर्जावर निर्बंध घातले आणि इतरही काही उपाय योजले त्यामुळे खेळत्या पैशाला काही विशिष्ट दिशेने आळा बसेल असा संभव आहे. त्याचबरोबर चालू वर्षी तुटीचा अर्थभरणा २०० कोटींपेक्षा अधिक करण्यात येणार नाही. इतकी चलनवाढ अर्थव्यवस्था पेलू शकेल आणि चलनवाढीचा दाब घातक होण्याइतका वाढणार नाही अशी अपेक्षा करण्यात येत आहे. कापूस आणि तेलबिया ह्यांचे उत्पादन घटल्यामुळे किमती चढू लागल्या असा सरकारी गोटाचा दावा आहे. ह्यावर उपाय म्हणून पी. एल. ४८० कायद्याप्रमाणे गिरण्यांसाठी कापूस आयात करण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याचप्रमाणे सोयाबीन आयात करण्याचीही व्यवस्था होत आहे. शक्य ते उपाय योजून किमतींना स्थिर पातळीवर ठेवणे आणि आर्थिक विकासाचा वेग वाढविणे असा हेतू ह्यामागे आहे. पण देशाला सर्व बाबतींत स्वयंपूर्ण करण्याचा उद्देश अजूनही दूरच आहे. अन्नधान्याच्या बाबतीत ह्या वर्षी स्वयंपूर्णता लाभेल असे वाटत होते. कारण चालू वर्षी अन्नधान्याचे उत्पादन १० कोटी टनांपेक्षाही थोडे अधिक झाले. तरीही अन्नधान्याची आयात थांबण्याची चिन्हे नाहीत. उलट, गेल्या वर्षाप्रमाणेच ह्याही वर्षी ४० लाख टन धान्याची आयात करण्याची व्यवस्था होत आहे. परदेशांची मदत मिळविण्याचा प्रश्नही अवघड होऊन बसला आहे.

परदेशांकडून घ्यावयाची मदत थांबविण्याच्या दृष्टीने चालू वर्षी जादा मदत मिळविण्याचे प्रयत्न चालू होते. पण त्यात यश येईल असे दिसत नाही. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात भारताला २ अब्जांपर्यंत परदेशी मदत मिळेल अशी अपेक्षा आहे. तशी ती मिळाली तरीही देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा ताण पडणार आहे. कारण, दरसाल घेतलेल्या कर्जांचे परतफेडीचे हप्ते व व्याज ह्यांचा बोजा वाढत जाणार आहे. औद्योगिक क्षेत्रातील चित्रही फारसे आशाजनक नाही. खाजगी व सार्वजनिक विभागांतील उद्योगधंद्यांतील उत्पादन त्यांच्या पूर्ण शक्तीने होत नाही. त्यांच्या उत्पादनक्षमतेपैकी फक्त ५० टक्के क्षमताच वापरली जात आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेतील काळात उत्पादन चालू ठेवण्यासाठी उद्योगधंद्यांना दरसाल १,८०० ते २,४०० कोटी रुपयांच्या मालाची आयात करावी लागणार आहे. उद्योगधंद्यांनी आपआपल्या पायावर उभे राहण्यासंबंधीच्या घोषणा कागदावरच राहिल्या आहेत. आर्थिक विकासाची कामे पार पाडण्यात जसजसा अनुभव येत आहे, तसतशी एक गोष्ट स्पष्ट होत चालली आहे. ती अशी की प्रगत देशांकडून मिळणाऱ्या मदतीवर भारताला आपली मदार अधिकाधिक ठेवावी लागणार आहे आणि परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीच्या बाबतीत तर अनश्चितपणा चालू आहे. राजकीय दृष्टया भारत कोणत्याही देशाच्या गटात सामील नाही; तो अलिप्त आहे, अशी भूमिका घेतली जात आहे. परंतु वस्तुस्थिती मात्र तशी नाही. अमेरिकेची समजूत अशी झालेली आहे की भारत रशियाशी अधिक मिळतेजुळते घेत आहे. अशा परिस्थितीत स्वयंपूर्णता साधण्यासाठी निकराचे व हेतुपूर्वक प्रयत्न करावे आणि परिस्थितीवर व नव्या घडामोडींवर लक्ष ठेवावे ह्यापेक्षा अधिक काही शक्य नाही.

---

## रसायनिक खते स्वस्त मिळविण्याची खटपट

भारत सरकारच्या पुरवठा खात्याचे अधिकारी अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांकडून घ्यावयाच्या खताचा सौदा करण्यासाठी वॉशिंग्टनला गेले आहेत. खताच्या खरेदीची किंमत भारताला अमेरिकेने दिलेल्या मदतीमधून डॉलरच्या चलनात द्यावी लागते. गेल्या वर्षा सुमारे ७ लाख टन खत परदेशांतून आयात करण्यात आले. त्यापैकी जवळ जवळ निम्मी खरेदी उत्तर अमेरिकेतील देशांकडून करण्यात आली होती. नत्रयुक्त खताच्या अमेरिकेतील किमती जगात सर्वांत अधिक आहेत. खताच्या खरेदीसाठी भारताला दर टनामागे ८० डॉलर्स अथवा ६०० रुपये मोजावे लागले. शिवाय अमेरिकेच्या कायद्याप्रमाणे खरेदी केलेल्या खतापैकी निम्मे खत अमेरिकन बोटीतूनच पाठवावे लागते. म्हणजे खताची खरेदी आणि वाहतूक दोन्हीही महाग पडतात. वॉशिंग्टनला गेलेले अधिकारी खताची किंमत कमी करून घेण्याची खटपट करणार आहेत. इराणच्या आखाताच्या परिसरातील देश ही रासायनिक खते टनामागे ५० डॉलर्स किंवा ३७५ रुपये ह्या दराने पुरविण्यास तयार आहेत. पण त्याची किंमत मात्र फक्त परदेशी चलनात चुकती करावी लागते. जपानमधील किमती इराणकडील खताच्या मानाने थोड्या जास्त आहेत. परंतु अमेरिकेतील किमतींपेक्षा कमी आहेत. जपानी खताची किंमत भारताला जपानने दिलेल्या कर्जातून देता येणे शक्य आहे. अलीकडे भारतामधील खताचे उत्पादनही वाढत चालले आहे. त्यामुळे चालू वर्षी भारताला मागील वर्षाइतकी खताची आयात करावी लागणार नाही असा अंदाज आहे. अमेरिकेत गेलेले अधिकारी ह्या सर्व परिस्थितीची अमेरिकेला जाणीव करून देणार आहेत. परत येताना ते जपानमार्गे येणार आहेत. हिंदमधील रासायनिक खतांचे उत्पादन मागणी पुरविण्यास समर्थ ठरेपर्यंत आयात केल्याशिवाय दुसरा मार्ग अर्थातच नाही.

---

## साखरेच्या सुकाळामुळे कारखान्यांना डोकेदुखी

बाजारपेठेत सध्या साखरेचा सुकाळ आहे. पुढील वर्षी साखर सध्यापेक्षाही मुबलक होण्याची शक्यता आहे. कारण, उसाच्या लागवडीसंबंधी ज्या वार्ता येत आहेत त्यावरून येत्या हंगामात लागवड चालू वर्षाइतकी राहणार आहे. उसाची लागवड पहिल्याप्रमाणेच चालू ठेवण्याचे सरकारचे धोरण आहे. परिणामी १९७०–७१ सालात साखरेचे उत्पादन चालू वर्षाइतके तरी राहणारच आहे. देशातील साखरेची गरज सुमारे ३० ते ३२ लाख टनांची आहे. पण गेल्या हंगामात उत्पादनाने ४३ ते ४५ लाख टनांपर्यंत मजल मारलेली आहे. पुढील हंगामात एवढे उत्पादन झाल्यास १९७१ साली साखरेचा शिलकी साठा ३२ लाख टनांपर्यंत राहील. इतक्या मोठ्या प्रमाणावर साखर शिल्लक राहिल्यास तिची साठवण आणि कर्ज पुरवठा ह्या संबंधी अतिशय गंभीर स्वरूपाचे प्रश्न निर्माण होणार आहेत. गेल्या हंगामात तो शिगेला पोचला होता, त्यावेळी साखरेचा साठा ३० लाख टनापर्यंत फुगला होता. त्यामुळे साखरेची साठवण करण्यासाठी लागणारी गुदामे तुडुंब भरून साखर कोठे ठेवावी अशी पंचाईत पडली होती. काही कारखान्यांनी तर गुदामांच्या अभावी पोती उघड्यावरच ठेवली. साखरेची विक्री होऊन कारखान्यांच्या हाती पैसे पडण्यास जो काळ लागतो त्या काळात आवश्यक खर्च चालू ठेवण्यासाठी त्यांना बँकांकडून साखरेच्या तारणावर नेहमीच कर्जे घ्यावी लागतात. गेल्या वर्षी साखर कारखान्यांनी बँकांकडून १२० कोटी रुपयांची कर्जे घेतलेली होती. चालू वर्षी कर्जाची रक्कम २५० कोटी रुपयांपर्यन्त फुगली होती. साखरेचा उठाव व्हावा तितका न झाल्याचा हा परिणाम.

साखरेची विक्री अजूनही मोठ्या प्रमाणावर सुधारण्याची चिन्हे नाहीत. त्यामुळे बँकांच्या कर्जाची फेड करणे कारखान्यांना कठीण होत आहे. पुढील हंगामात साखरेचे उत्पादन गेल्या हंगामाइतके झाल्यास साखर कारखान्यांची कर्जाची जरूरी ४०० कोटी रुपयांच्या घरात जाईल असा अंदाज आहे. बँका पूर्वी दिलेल्या कर्ज पुरवठ्यामुळे आजच काहीशा तंग अवस्थेत आहेत. पुढील हंगाम सुरू झाल्यावर साखर कारखान्यांना आणखी मोठ्या प्रमाणावर कर्जे देणे त्यांना कितपत जमेल अशी शंका उत्पन्न होत आहे. नियंत्रित दराने ग्राहकांना साखरेचा पुरवठा करण्यासाठी सरकार उत्पादनापैकी ७० टक्के साखर आपल्या ताब्यात घेत असते. उरलेली साखर खुल्या बाजारात विकण्याची कारखान्यांना मुभा असते. पण साखरेचा साठा वाढत चालल्यामुळे नियंत्रित दराने साखरेची विक्री करणे सरकारलाही अवघड जात आहे. सरकारने नियंत्रित दराने घेण्याच्या साखरेत कपात केली तर साखर कारखानदारांजवळील साखरेचा साठा आणखी वाढून भाव गडगडण्याचा संभव वाढणार आहे. सरकारने साखर विकत घेऊन अडीअडचणीला उपयोगी पडण्यासाठी साठा करून ठेवावा असे कारखानदारांचे म्हणणे आहे. सध्या तुंबून राहिलेला साखरेचा साठा ह्याच स्वरूपाचा आहे असे सरकारचे म्हणणे आहे. म्हणून साखर विकत घेण्याची त्याची तयारी नाही. ह्या परिस्थितीतून मार्ग म्हणून अधिक प्रमाणात साखर निर्यात करण्याची सूचना करण्यात येते. सध्या भारताला ४ लाख, ५० हजार टन साखर निर्यात करण्याची परवानगी आहे. अधिक साखर निर्यात करावयाची तर अधिक तोटा सहन करावयास पाहिजे. कारण आंतरराष्ट्रीय किमती भारतापेक्षा कमी आहेत.

---

## नेपोलियनचे देणे भागविण्याची फ्रान्सला विनंती

### १६० वर्षांपूर्वीच्या ३,५०० पौंडांचे आज ५ कोटी पौंड देणे झाले

स्वित्सर्लंडमधील एका खेड्याच्या कौन्सिलने फ्रान्सकडे १६० वर्षांपूर्वीच्या येण्याची मागणी केली आहे. नेपोलियन १८०४ मध्ये फ्रान्सचा सम्राट झाल्यानंतर त्याच्या फौजेने इटलीच्या सरहद्दीवरील ह्या स्विस खेड्यात मुक्काम केला होता. नेपोलियनने स्थानिक माणसे आणि खेचरे कामाला घेतली, पण त्यांचे पैसे दिले नाहीत. त्याने झाडे तोडली पण कबूल केल्याप्रमाणे नुकसान भरपाई केली नाही. त्याने स्वतःच्या राहण्याचे आणि जेवणाचेही पैसे दिले नाहीत. ह्या फ्रेंच खेड्याच्या कौन्सिलला जुन्या कागदपत्रात नेपोलियनने फ्रान्सला परत गेल्यावर लिहिलेले एक पत्र सापडले. त्यात त्याने सर्व देणे देण्याचे आश्वासन दिले होते. त्याची रक्कम तेव्हा ३,५०० पौंड असली, तरी चक्रवाढ व्याजाने आता ती ५ कोटी पौंड झाली आहे.

---

## वैमानिकांतील बेकारी दूर करण्याची मागणी

म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सने रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी कशा उपलब्ध कराव्या ह्यासंबंधी एक परिसंवाद भरविला होता. परिसंवादाचे उद्घाटक भारत सरकारचे माहिती खात्याचे मंत्री श्री. गुजराल हे होते. ते परिसंवादाच्या उद्घाटनाला जात असता एका बेकार वैमानिकाने प्रशिक्षित वैमानिकांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांना एक खलिता सादर केला. व्यापारी स्वरूपाची वैमानिक वाहतूक वाढत असल्याने वैमानिकांना नोकरीच्या अधिकाधिक संधी लाभत आहेत असा समज आहे. पण खलित्यात दिलेल्या माहितीप्रमाणे असे २०० वैमानिक नोकरीविना असून त्यांचे परवाने रद्द होण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. वैमानिकाला आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी सरकारी मदत जमेस धरून सुमारे ३० हजार रुपये खर्च करावे लागतात. पिकांवर फवारा मारण्याच्या कामासाठी हवाई दलातील निवृत्त वैमानिकच अधिक पसंत करण्यात येतात.

---

## पूर्वरचित घरांना जपानमध्ये वाढती मागणी

राहत्या घरांची टंचाई जगातील अनेक देशांत तीव्रतेने भासत आहे. जपानसारख्या उद्योगप्रधान देशातही ती अर्थातच भासत आहे. गेल्या काही वर्षांत जपानने इतर अनेक क्षेत्रांप्रमाणे पूर्वरचित घरांच्या उत्पादनातही खूप प्रगती केली आहे. १९६२ मध्ये जपानात अवघी ५,००० पूर्वरचित घरे तयार करण्यात आली होती. तीन वर्षांनंतर म्हणजे १९६५ मध्ये ३० हजार पूर्वरचित घरे उत्पादन करण्यात आली. १९६९ मध्ये त्यांची संख्या १ लाख, ३५ हजारपर्यंत आली होती. पूर्वरचित घरांच्या उत्पादनाचा वेग आता दरसाल ५० टक्क्यांनी वाढेल असा अंदाज आहे. जपानमधील लोकांना सुमारे २७ लाख राहत्या घरांची तातडीची गरज आहे. पूर्वरचित घरे तयार करणाऱ्या कंपन्यांना इतकी मोठी मागणी पुरविणे अवघड जात आहे. हजारो तरुण-तरुणींना राहण्याच्या जागेची आवश्यकता आहे. त्यासाठी थोडी अधिक किंमत द्यावी लागली तर ती देण्याची त्यांची तयारी आहे. घरे मिळविण्यासाठी कारखानदार त्यांच्या नोकरांना कर्जे देण्यास तयार आहेत. शिवाय अनेक प्रकारच्या भाडे-खरेदी योजनाही आखण्यात आल्या आहेत. पूर्वरचित घरांचा जपानचा धंदा १० वर्षांपूर्वी निघालेला आहे. त्यावेळी एका कंपनीने प्रथम मुलांसाठी एक खोली तयार केली. ती फारच यशस्वी झाली. सध्या सुमारे १८० कंपन्या पूर्वरचित घरे तयार करीत असतात. घरांचे खांब हलक्या वजनाच्या पोलादाचे असतात. छप्पर आणि भिंती कडक बोर्डांच्या असतात. घर उभारण्यास अवघे तीन तास लागतात. घराला द्याव्या लागणाऱ्या पायाचे काम जमेस धरून घर दोन दिवसांत राहण्यासाठी तयार होते. घरात उष्णतेचा त्रास फारसा होऊ नये अशी व्यवस्था केलेली असते.

---

## टेलिव्हिजनच्या सेट्‌सचे उत्पादन

हिंदमधील टेलिव्हिजनच्या सेट्‌सची गरज भागविण्यासाठी पावले उचलण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. दूरदर्शक सेट्‌स तयार करणाऱ्या कारखान्यांकडून टेंडर्स मागविण्यात आली आहेत. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात मुंबई, पुणे, कलकत्ता, मद्रास, लखनौ, कानपूर आणि श्रीनगर ह्या शहरांत दूरदर्शन केंद्रांची स्थापना करण्यात येणार आहे. सध्या फक्त दिल्ली येथेच एक केंद्र आहे. टेलिव्हिजनचे सेट्‌स तयार करण्याचे परवाने सध्या फक्त दोन कंपन्यांनाच देण्यात आलेले आहेत. हे कारखाने दरसाल १० हजार सेट्‌स तयार करू शकतील. त्याशिवाय छोट्या कारखान्यांच्या दोन गटांनाही सेट्‌स तयार करण्याचे परवाने देण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील कारखाने संयुक्तपणे दरसाल ५ हजार सेट्‌स तयार करू शकतील.

---

## उशिरा येणाऱ्या मंत्र्यांच्या दंडाचा फंड वाढत चालला

म्हैसूर राज्याच्या मंत्रिमंडळाच्या सभेस उशिरा येणाऱ्या प्रत्येक मंत्र्याने ५ रु. दंड दिला पाहिजे, असे मुख्य मंत्री ह्यांनी मे, १९६९ मध्ये मुख्य मंत्री झाल्यावर ठरविले. प्रत्येक मंत्र्यालाच केव्हा ना केव्हा तरी दंड द्यावा लागला आहे. ह्या दंडाची आता एकूण १,७८० रु. एवढी रक्कम जमली आहे. दंड देणाऱ्यात मुख्य मंत्री श्री. वीरेंद्र पाटील हे स्वतः आणि अर्थमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे हे अग्रस्थानी आहेत. मंत्रिमंडळाच्या सभेला उशीरा येण्यापेक्षा न येणे स्वस्त पडते; कारण गैरहजेरीला दंड ठेवलेला नाही. "तुम्ही स्वतःच वक्तशीरपणाचा नियम कसा मोडता ?" ह्या प्रश्नाला श्री. पाटील ह्यांनी उत्तर दिले, "काय करणार ? भेटायला येणारे लवकर हालतच नाहीत. अर्धा मिनिट उशीर झाला, तरी दंड दिला पाहिजे, असा आमचा नियम आहे." दंडाच्या फंडाचे कोषाध्यक्ष उद्योगमंत्री श्री. राजशेखर मूर्ती हे आहेत. "ह्या फंडाच्या पैशातून म्हैसूर राज्याच्या लॉटरीची तिकिटे घेण्यात यावीत; मंत्र्यांनी त्यासाठी स्वतःचे सिंडिकेट बनवावे" अशी सूचना एका पत्रकाराने केली, ती मुख्य मंत्र्यांनी हसण्यावारी नेली.

---

## गुरखा पेन्शनर सैनिकांसाठी फंड

ग्रेट ब्रिटनच्या लष्करातील गुरख्यांची संख्या सध्या १५,००० आहे ती ह्या वर्षअखेर ६,००० वर उतरविण्यात येईल. त्यामुळे, नेपाळमधील पेन्शनर गुरखा सैनिकांच्या संख्येत आणखी वाढ होईल, आणि ती १,२५,००० भरेल. नेपाळमधील महागाईमुळे त्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. लष्करातील गुरखा पलटणीमधील प्रत्येक अधिकाऱ्याने व सैनिकाने दरसाल एक दिवसाचा पगार देऊन जमलेल्या रकमेतून पेन्शने दिली जात. आता गुरखा पलटणीच कमी झाल्यामुळे आणि पेन्शनरांची संख्या वाढल्यामुळे अडचण निर्माण झाली आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी, ग्रेट ब्रिटनमध्ये २ कोटी रुपयांचा फंड जमा करण्यासाठी एक विनंतिपत्रक काढण्यात आले आहे, त्यावर नऊ फील्ड मार्शलांच्या सह्या आहेत. त्यात फील्ड मार्शल लॉर्ड मॉंटगॉमरी ह्यांची पहिली सही आहे.

---

## प्रचंड जिंदगीचे उद्योगसमूह

१९६३-६४मध्ये वर्गीकृत केलेले खालील उद्योगसमूह ३५कोटी रु. पेक्षा जास्त जिंदगी असलेल्या समूहांच्या यादीत १९६७-६८ मध्ये दाखल झाले. कस्तुरभाई लालभाई (५९·२१ कोटी रु.), मॅकनील अँड बॅरी (६२·५६ कोटी रु.), जार्डिन हेंडरसन (४३·९१ कोटी रु.), मेसर्स टी. व्ही. सुंदरम अय्यंगार (५०·८६ कोटी रु.), महिंद्र अँड महिंद्र (५१·३४ कोटी रु.), किर्लोस्कर (६१·२० कोटी रु.), खटाव (४३·८५ कोटी रु.), पॅरी (५३·७९ कोटी रु.), शेषाद्री (४०·४९ कोटी रु.) आणि बजाज (४५·५४ कोटी रु.).

**नवी एअरमेल पोस्ट कार्डे**—नव्या एअरमेल पोस्ट कार्डांच्या विक्रीस प्रारंभ झाला आहे. त्यांची किंमत ७५ पैसे असून ती कोणत्याही देशाला पाठविता येतात.

**टेलिफोनच्या थकबाकीदारांना दिलासा** – टेलिफोनची थकबाकी २५ रु. पेक्षा कमी असल्यास टेलिफोनच्या तारा तोडल्या जाणार नाहीत; २५ रु. पेक्षा जास्त थकबाकी असल्यास तारा तोडण्यापूर्वी थकबाकीदाराला पैसे भरण्यास पुरेशी सवड दिली जाईल. सध्याच्या नियमाप्रमाणे फक्त ५ रु. थकबाकी असली, तर टेलिफोनच्या तारा तोडता येतात.

**विद्यापीठाची 'विनोदा'ची पदवी**— मनिला विद्यापीठ विनोदाचे विविध प्रकार शिकविणारी एक स्वतंत्र शाखा निर्माण करणार आहे. त्यात विदुषकी, व्यंगचित्रे, इत्यादींचाही समावेश असेल. एका स्थानिक विनोदी लेखकाकडे आणि संगीतरचनाकाराकडे अभ्यासक्रम तयार करण्याचे काम सोपविण्यात आले आहे.

**प्रत्येक धावेला एक डॉलर** — दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज बी. आर. रिचर्डस् हा ऑस्ट्रेलियास जाऊन एक वर्षाच्या कराराने खेळणार आहे, तेव्हा त्याला दर आठवड्यास १४० डॉलर मिळणार असून त्याने काढलेल्या प्रत्येक धावेला एक डॉलर बक्षिसी मिळेल. त्याला गोलंदाजी करता येत नाही, पण त्याने घेतलेल्या प्रत्येक विकेटला १० डॉलर मिळतील.

**वानराच्या स्मृत्यर्थ देवालय** – स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खामगाव शाखेच्या छपरावर एक वानर गेल्या डिसेंबरपासून राहात असे. एका झाडावरून खाली पडून ते नुकतेच मरण पावले. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी वानराचे स्मृत्यर्थ एक हनुमान मंदिर बांधले.

**शिवाजी अजूनही लुटारू?** – ग्रेट ब्रिटनमधील टेलिव्हिजनवर "भारत – एक गोंधळलेला राक्षस" ह्या नावाचा अनुबोधपट दाखविण्यात आला, त्यात भारतात जन्मलेला कवि–लेखक डॉम मोरॅस ह्याचे भाष्य होते. त्याने शिवाजी महाराजांचे वर्णन 'लुटारू' असे केले होते. ह्या भारताच्या राष्ट्रीय वीरपुरुषाचा अशा रीतीने बेदरकारपणे उपमर्द करण्यात आला, त्याविरुद्ध लंडनमधील महाराष्ट्रीय पत्रकार श्री. द. वि. ताम्हणकर ह्यांनी तीव्र निषेध तेथे वृत्तपत्रातून जाहीरपणे व्यक्त केला आहे.

**चौथ्या योजनेत २८ नवी आकाशवाणी केंद्रे**—चौथ्या योजनेच्या काळात २८ नवी रेडिओ केंद्रे उभारण्यात येणार आहेत. त्यात रत्नागिरीत उभारण्यात यावयाच्या २० कि. वॅ. स्टेशनचा अंतर्भाव आहे.

**इंग्लंडमध्ये राहण्यास जागा सर्वांत जास्त**— जगातल्या इतर कोणत्याही देशापेक्षा इंग्लंड आणि वेल्समध्ये लोकांना राहण्यास जास्त जागा वाट्यास येते. तेथे प्रत्येक माणसागणिक सरासरी दीड खोली असते.




### पाकिस्तानला अमेरिकेकडून पुन्हा शस्त्रास्त्रे

१९६५ मधील भारत-पाकिस्तान संघर्षानंतर अमेरिकेने उभयता देशांना शस्त्रास्त्रे पुरविणे बंद केले. ह्या बंदीचा परिणाम पाकिस्तानवर अधिक झाला. एक तर अमेरिकेची पाकिस्तानला मिळणारी लष्करी मदत देणगीच्या स्वरूपाची होती, ती बंद झाली. भारत त्याही वेळी पाकिस्तानपेक्षा शस्त्रास्त्रांच्या बाबतीत अधिक स्वयंपूर्ण होता. आता अमेरिका पाकिस्तानचा शस्त्रपुरवठा पुन्हा चालू करण्याचा विचार करीत आहे. मात्र ही लष्करी मदत पाकिस्तानला विकत घ्यावी लागेल. फुकटफाकट मिळणार नाही. पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती शस्त्रास्त्रे विकत घेण्याइतकी चांगली आहे की नाही हाच खरा प्रश्न आहे. पाकिस्तानच्या राजवटीत लष्कराला महत्त्वाचे स्थान असल्यामुळे लोकांचे दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी लागणाऱ्या खर्चाला प्राधान्य देण्याऐवजी शस्त्रास्त्रांच्या खरेदीला महत्त्व देण्यात येण्याची शक्यता नजरेआड करता येत नाही. खुद्द अमेरिकन सरकारला पाकिस्तानला शस्त्रास्त्रांचा पुरवठा कोणत्याही प्रकारे चालू करणे पसंत नाही असे म्हणतात. पण अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांची पाकिस्तानला लष्करी मदत देण्यास अनुकूलता आहे. म्हणजे भारताचा ह्या शस्त्रास्त्र पुरवठ्याला असणारा विरोध डावलण्यात येणार असाच अर्थ होतो. अमेरिकेने दिलेल्या शस्त्रास्त्रांचा उपयोग भारताविरुद्ध होणार नाही ह्या आश्वासनाला काहीच अर्थ नसल्याचे अमेरिकन लोक खाजगी रीत्या मान्य करतात. तरीही पाकिस्तानने चीनच्या आहारी पूर्णपणे जाऊ नये म्हणून सरकारी रीत्या तिकडे डोळेझाक करण्यात येईल असे दिसते. पाकिस्तानला शस्त्रपुरवठ्याच्या बाबतीत रशियानेही स्वार्थावर आधारलेलेच धोरण स्वीकारलेले आहे.

---

### " प्रदर्शनातील माझ्या वस्तूंचा २२·५० लाखांचा विमा उतरा "

लंडन येथे भरविण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल प्रदर्शनात मांडण्यासाठी ब्राझीलचा सुप्रसिद्ध फुटबॉलपटू पील हा काही वस्तू पाठविणार आहे, त्यांचा २२,५०,००० रुपयांचा विमा उतरविण्यात यावा, अशी त्याची मागणी आहे. गेल्या वर्षी त्याने स्वतःचा एक हजारावा गोल केला, तेव्हा त्याला सुवर्णमुकुट बक्षीस मिळाला होता, तो ह्या प्रदर्शनात ठेवला जाईल. मेक्सिको येथे जागतिक फुटबॉल स्पर्धेच्या वेळी त्याने वापरलेला शर्ट, चड्डी, बूट इत्यादींचा ह्या प्रदर्शनात समावेश असेल.

---

### अमेरिकेत ३·१ कोटी शेअरहोल्डर्स

अमेरिकेतील भागधारकांची संख्या पाच वर्षांपूर्वीच्या मानाने ५२% वाढून ती आता ३·१ कोटी एवढी झाली आहे.

---

### डॉक्टरच्या शिक्षणास ८०,००० रु. खर्च येतो

पदवीधर डॉक्टर तयार करण्यास भारतात प्रत्येकी ८०,००० रु. समाजाचे खर्च होतात. मेडिकल कॉलेजपूर्वीच्या शिक्षणखर्चाचा त्यात समावेश नाही.


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

★ डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स ★

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

*संस्थापक—कै. प्रा. ग. कृ. भोपटकर : स्थापना १९१८ : टेलिफोन नंबर ५४१६०*

नवीन वर्षासाठी सोमवार, दि. २२ जून, १९७० पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू झाले.

— महत्त्वाचे अभ्यासक्रम —

(१) गव्हर्नमेन्ट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.) : मुदत : १ वर्ष, किमान पात्रता : एस्. एस्. सी.
वेळा : सकाळ, दुपार किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी. विद्यार्थिनींसाठी फक्त सकाळच्या वेळेत स्वतंत्र वर्ग.

(२) प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता : इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

(३) प्री-डिग्री आर्ट्स् एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता :- इंग्रजी घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

— इतर अभ्यासक्रम —

बी. कॉम्. पार्ट वन व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम्. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम्., कंपनी सेक्रेटरी, फॉरेस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शॉर्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

प्रसिद्धि-पत्रक : ५० पैसे

अ. ग. भोपटकर
एम्. कॉम्., एलएल्. बी.
प्राचार्य




माझा छोटासा उद्योग
अगदी झकास चाललाय !
त्यासाठी,
बँक ऑफ महाराष्ट्र ने
योग्य वेळी केलेल्या
आर्थिक सहाय्याबद्दल
माझे मनापासून धन्यवाद !

३५०० हून अधिक छोट्या उद्योगांना आमचे आर्थिक सहाय्य लाभले आहे.
सुमारे २० कोटींच्या घरात.

**संपन्नतेची वाटचाल करणाऱ्या या समूहात तुम्ही का सहभागी होत नाही ?
अधिकाधिक संपन्न होण्यासाठी !**

तपशीलासाठी आजच चौकशी करा:

# बँक ऑफ महाराष्ट्र



हेड ऑफिस :
११७७ बुधवार पेठ, पुणे २.

6996



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)